## पिंपरी चिंचवड महानगरपालिका , पिंपरी - ४११ ०१८
## जाहिरात क्रमांक - ९३/२०१३

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील खालील नमूद पदे सरळसेवा प्रवेशाने भरतीसाठी पात्र असलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. भरण्यात येणा-या पदांची नावे, वेतनश्रेणी, पदसंख्या, आरक्षण व पदांसाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता व अनुभव यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | पदनाम | पे बँड व ग्रेड वेतन | शैक्षणिक पात्रता व अनुभव | पदांची संख्या | आरक्षण |
|---|---|---|---|---|---|
| १ | नगरसचिव गट-अ | र.रु.१५६००-३९१०० ग्रे.पे. ६६०० | १. सांविधानिक विद्यापीठाची कला, विज्ञान, वाणिज्य किंवा विधी शाखेची पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२. शासकीय, निमशासकीय किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेमधील जबाबदारीच्या पदावरील किमान ०५ वर्षाचा अनुभव.<br>उमेदवाराकडे पे.बँड र.रू ९३००-३४८०० ग्रेड वेतन रू ४४०० व त्यापुढील वेतनश्रेणीतील गट-ब मधील जबाबदारीच्या पदावरील कामाचा ५ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. | ०१ | खुला ०१ |
| २ | प्रशासन अधिकारी गट-ब | र.रू. ९३०० - ३४८०० ग्रेड पे र.रू ५४०० | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कोणत्याही शाखेचा पदवीधर.<br>२. स्थानिक स्वराज्य संस्था अथवा शासन अंगीकृत कार्यालयामधील कामकाजाचा ७ वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>३. एल.जी.एस पदविका धारकांना प्राधान्य. प्रशासकीय संवर्गातील किमान गट-क च्या पदावरील कामकाजाचा अनुभव असावा. | ०८ | अनु.जाती - ०१<br>अनु.जमाती - ०१<br>विजा(अ) - ०१<br>इमाव - ०१<br>खुला - ०३<br>खुला महिला - ०१ |

### लेखी परीक्षेचे वेळापत्रक

| अ. क्र | पदाचे नाव | लेखी परीक्षेचा दिनांक | वेळ | लेखी परीक्षेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | नगरसचिव | २१/०९/२०१३ | १२.०० ते १.३० | पंडित दिनदयाळ माध्यमिक विद्यालय, वल्लभनगर, (वल्लभनगर एस.टी.स्टॅण्ड जवळ) पिंपरी ४११० १७. |
| २ | प्रशासन अधिकारी | २१/०९/२०१३ | २.३० ते ४.०० | पंडित दिनदयाळ माध्यमिक विद्यालय, वल्लभनगर, (वल्लभनगर एस.टी.स्टॅण्ड जवळ) पिंपरी ४११० १७. |

### लेखी परीक्षेमधून गुणानुक्रमे पात्र ठरलेल्या उमेदवारांचे मौखिक मुलाखतीचे वेळापत्रक

| अ. क्र | पदाचे नाव | मौखिक मुलाखतीचा दिनांक | वेळ | लेखी परीक्षेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | नगरसचिव व प्रशासन अधिकारी | २३/०९/२०१३ | ११.०० वा | पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे मुख्य प्रशासकीय कार्यालय, ४ था मजला, प्रशासन विभाग, मुंबई - पुणे महामार्गालगत लगत, पिंपरी १८. |

**अटी व शर्ती -**

१) वरील पदांसाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवेतील अर्ज करणा-या अधिकारी व कर्मचा-याकरीता उच्चतम वयोमर्यादा लागू असणार नाही.

२) इतर सर्व उमेदवारांसाठी दिनांक १४/०८/२०१३ रोजी किमान १८ वर्षे व कमाल ३३ वर्षे मागासवर्गीयांकरिता ३८ वर्षे प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त/अपंग यांचे बाबतीत ४५ वर्षेपर्यंत कमाल वयोमर्यादा. किमान वयोमर्यादा १८ व कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे राहील.

३) शासन निर्णय क्र.रिपभ/प्र.क्र.६६/२०११/ई-१०, दि. २७ जून २०११ नुसार ज्या उमेदवारांकडे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) उपलब्ध नसल्यास त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा जन्म दाखला सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात अधिवास प्रमाणपत्राची अट लागू राहणार नाही.

३अ) सदर उमेदवाराकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्मतारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास, त्या उमेदवाराने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु सदर शाळा सोडल्याचा दाखल्यामध्ये त्या उमेदवाराचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात देखील अधिवास प्रमाणपत्राची आवश्यकता असणार नाही.

३ब) उपरोक्त बाबी फक्त महाराष्ट्र राज्यात जन्म झालेल्या उमेदवारांसाठी लागू राहतील. इतर उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आवश्यक राहील.

४) मागासवर्गीय प्रवर्गातील आरक्षण हे महाराष्ट्र राज्याच्या अधिनिवासी उमेदवारापुरते मर्यादित राहील. आरक्षित मागास प्रवर्गाचा दावा करणा-या उमेदवारांना त्या संदर्भातील सक्षम अधिका-याने दिलेले जात प्रमाणपत्र (Cast Certificate) उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्राची (Cast Validity Certificate) साक्षांकित प्रत कागदपत्रे पडताळणीचे वेळेस सादर करणे आवश्यक आहे.

५) लेखी परीक्षेमध्ये फक्त काळया/निळया शाईच्या बॉलपेनचा वापर करणे बंधणकारक आहे.

६) शासन सामान्य प्रशासन विभागास परिपत्रक क्र.एस.आरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१६ अ दिनांक १६/३/१९९९ अन्वये समांतर आरक्षणातील प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध झाले नाही तर सामाजिक आरक्षणातील त्या-त्या प्रवर्गातील उमेदवारांची निवड करण्यात येईल.

७) सामान्य प्रशासन विभाग यांच्याकडील पत्र क्र पअंक-१०१०/७१७/प्र.क्र.३२२/१०/१६अ दिनांक २६/८/२०१० चे पत्रान्वये एकदा नोकरी मिळाल्यानंतर पुन्हा दुस-या पदावर नोकरी मिळण्यासाठी त्यास समांतर आरक्षणाचा लाभ देणे शासन धोरणाशी विसंगत आहे. एकदा उमेदवाराने समांतर आरक्षणाचा लाभ घेतला असल्यास त्या उमेदवारास पुन्हा समांतर आरक्षणाचा लाभ देता येणार नाही.

८) महिला आरक्षण हे शासन निर्णय महिला व बालकल्याण विभाग ८२/२००१ म.से.आ-२०००/ प्र.क्र . ४१५/का-२ दि २५/५/२००१ मधील तरतुदीनुसार राहील. खुल्या प्रवर्गातील महिलांना उन्नत व प्रगत व्यक्ती व गट यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिकारी यांचे दि ३१/३/२०१३ या दिनांकापर्यंत वैध असलेल्या नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

९) खुल्या प्रवर्गातील महिला आरक्षित पदांसाठी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील महिला उमेदवारांनी सक्षम प्राधिका-यांनी निर्गमित केलेले जात व जात वैधता प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक राहील. जर ते जात व जात वैधता प्रमाणपत्र सादर करून शकत नसल्यास अशा महिला उमेदवारांनी खुल्या प्रवर्गातील महिलांप्रमाणेच उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

९) वि.जा(अ) व इ.मा.व, प्रवर्गातील उमेदवारांनी समाजाच्या उन्नत व प्रगत व्यक्ती गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमीलेअर) दि ३१/३/२०१३ पर्यंतचे वैध असलेले प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांचा आरक्षित पदांसाठी विचार केला जाणार नाही.

११) अर्ज करणा-या उमेदवारांने ज्या पदासाठी अर्ज केला असेल त्या पदाची शैक्षणिक अर्हता व इतर अर्हता जाहिरातीच्या दिनांकास धारण केलेली असणे आवश्यक आहे.

१२) इतर स्थानिक स्वराज्य संस्था तसेच शासकीय / निमशासकीय सेवेतील अर्हताधारक अधिकारी / कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज विहित मुदतीत विभागप्रमुखांचे परवानगीने भरावेत. अशा अर्जदारांनी त्यांचे अर्ज, संबधित विभागप्रमुखांमार्फत विहीत मुदतीत महापालिका प्रशासन विभागाकडे पाठविणे आवश्यक असून अर्जासोबत विभागप्रमुखांच्या परवानगीची प्रत व सर्व आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रती जोडणे आवश्यक आहे.

१३) उमेदवार ज्या शासकीय/ निमशासकीय/ स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये कार्यरत आहे त्या संस्थेच्या विभागप्रमुखांनी प्रमाणित केलेले या जाहिरातीच्या सोबत प्रसिध्द केलेल्या नमुन्यातील प्रमाणपत्र उमेदवाराने अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

१४) अर्जदाराने सोबत दिलेल्या विहित नमुन्यात ३० से.मी. x २० से.मी. आकाराच्या जाड पांढ-या कागदावर अर्ज करावा. त्यावर पासपोर्ट आकाराचा नव्याने काढलेला व स्वतःचा स्वाक्षरी असलेला फोटो लावावा. मागास प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांचेकडे असलेले जातीचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.

१५) वरील पदांसाठी खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी र.रू २००/- व मागासवर्गीय उमेदवारांनी र.रू १००/- इतके परीक्षा शुल्क आयुक्त,पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या नावे बँक ऑफ बडोदा,शाखा पी.सी.एम.सी. येथील खाते क्रमांक ३१०६०२०००००८७ या खात्यावर बँक ऑफ बडोदा यांचे कोणत्याही शाखेत चलनाद्वारे जमा करणे आवश्यक आहे. सदर चलनाची मूळ प्रत उमेदवाराने अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. सदर मूळ प्रत अर्जासोबत न जोडल्यास अर्ज अपात्र करणेत येईल. सदर चलनाची झेरॉक्स प्रत उमेदवाराने स्वतःजवळ ठेवावी. उमेदवाराने एकापेक्षा जास्त अर्ज केल्यास प्रत्येक पदासाठी स्वतंत्र चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे. त्याकरिता बँक ऑफ बडोदाच्या चलनाची प्रत उमेदवारांनी महापालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावरून download करून घ्यावी. परिक्षा शुल्कामध्ये सवलत मिळण्याकरीता मागास प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांचे जातीचे वैधता प्रमाणपत्राची अथवा जातीच्या दाखल्याची सत्यप्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. मागासप्रवर्गातील उमेदवारांकडे जात प्रमाणपत्र नसल्यास अथवा अर्जासोबत न जोडल्यास त्यांनी खुल्या प्रवर्गाप्रमाणे र.रू २००/- चे परिक्षा शुल्क भरावे. कोणत्याही परिस्थितीत सदर परीक्षा शुल्क परत केले जाणार नाही. मुदतीनंतर आलेले अर्ज तसेच अर्जाचे छाननीमध्ये अपात्र ठरलेल्या उमेदवारांचे परीक्षा शुल्क परत केले जाणार नाही. उमेदवाराने उक्त नमूद केलेप्रमाणे विहीत रक्कमेपेक्षा कमी परीक्षा शुल्क भरल्यास सदर अर्ज अपात्र करणेत येईल.

१६) जाहिरातीच्या अनुषंगाने अधिकृत अर्जाचा नमुना महापालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावरुन Download करुन घेता येईल.

१७) अर्ज मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी -१८ यांच्या नावाने दि. १४/८/२०१३ पर्यंत पोहचतील अशा बेताने पोष्टाने पाठवावेत. कोणत्याही कारणास्तव मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. कोणत्याही परिस्थितीत समक्ष अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

१८) टपाल खात्यामुळे झालेल्या कोणत्याही विलंबास अथवा टपाल गहाळ झाल्यास महापालिका जबाबदार राहणार नाही.

१९) अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, वय, जातीचा दाखला, अपंगत्वाचा दाखला, अधिवास प्रमाणपत्र, माजी सैनिक प्रमाणपत्र, प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त दाखला, लहान कुटुंबाचे नोटराईज प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रांच्या साक्षांकित झेरॉक्स प्रती तसेच जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध असल्यास त्याची साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडावी. जन्मतारखेसाठी शाळा सोडल्याचा दाखला / जन्मनोंदीचा दाखला यांची साक्षांकित प्रत जोडावी. साक्षांकित प्रती केंद्र/राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी, पोस्ट मास्तर, मुख्याध्यापक तसेच साक्षांकनाबाबत प्राधिकृत व सक्षम अधिका-यांनीच स्वहस्ताक्षरात साक्षांकित केलेल्या असाव्यात. सहीच्या शिक्क्याचे साक्षांकन ग्राहय धरले जाणार नाही. अपुर्ण भरलेले अर्ज तसेच अर्जासोबत आवश्यक कागदपत्राच्या साक्षांकित सत्यप्रती जोडलेल्या नसल्यास अर्ज अपात्र करण्यात येईल व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही. अर्जदारांनी कोणतीही मूळ कागदपत्रे अर्जासोबत जोडू नयेत.

२०) खुल्या प्रवर्गातील महिला आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणा-या खुला, इतर मागासवर्ग,विजाभज व विमाप्र प्रवर्गातील महिला उमेदवारांनी उन्नत व्यक्ती/गट (क्रिमीलेअर) मध्ये मोडत नसल्याबाबतचे शासनाने जाहिर केलेल्या सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा त्या महिला आरक्षणाचा लाभ घेण्यास अपात्र ठरतील.

२१) उमेदवाराची सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी केली असल्यास, सदर नोंदणी कार्डाची सत्यप्रत अर्जासोबत तसेच आधार कार्डाची अथवा नोंदणी केलेल्या पावतीची झेरॉक्स सत्यप्रत जोडावी.

२२) अर्जाचे छाननीत पात्र ठरलेल्या उमेदवारांची लेखी परिक्षा घेण्यात येईल. लेखी परीक्षेत गुणानुक्रमे पात्र ठरणा-या उमेवारांच्याच मौखिक मुलाखती घेण्यात येतील.

२३) मुलाखतीस बोलविण्यात आलेल्या उमेदवारांना स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

२४) महिला उमेदवार विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र किंवा नावांत बदल झाल्यासंबंधी अधिसूचीत केलेले राजपत्राची साक्षांकीत प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

२५) उमेदवार अपंग,प्रकल्पग्रस्त,भूकंपग्रस्त माजी सैनिक किंवा खेळाडू असल्यास त्याबाबतच्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित सत्यप्रती अर्जासोबत जोडाव्यात.

२६) महाराष्ट्र शासनाकडील आदेश क्र. एस.आर.व्ही -२०००/प्रक्र१७/२०००/१२,दि. ०१/०७/२००५ अन्वये दि. २८/०३/२००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या २ पेक्षा अधिक असल्यास संबधित उमेदवाराचा नेमणुकीसाठी विचार करण्यात येणार नाही व तसे विहित नमुन्यात र.रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर नोटराईज केलेले अपत्याबाबतचे प्रतिज्ञापत्र नियुक्तीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

२७) निवड झालेल्या सर्व उमेदवारांना महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील शासन निर्णय क्रमांक अंनियो-१००५/सेवा-४, दि. ३१/१०/२००५ नुसार नवीन अंशदान निवृत्ती वेतन योजना म्हणजेच परिभाषित अंशदान निवृती योजना ( Defined contribution Pension System) लागु राहील. मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना म्हणजेच महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८८ व महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण नियम १९८४ आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही.

२८) उपरोक्त सर्व पदांसाठी आजपर्यंतच्या सर्व शासन निर्णयान्वये DOEACC सोसायटीच्या CCC किंवा O स्तर किंवा A स्तर , B स्तर , किंवा C स्तर किंवा MSCIT परिक्षा नेमणुक झाल्यापासुन १ वर्षामध्ये उत्तीर्ण होणे उमेदवारावर बंधनकारक राहील.

२९) महापालिकेस प्राप्त झालेल्या अर्जाची छानणी करुन पात्र ठरलेल्या उमेदवारांना लेखी परिक्षेचा बैठक क्रमांक, बैठक व्यवस्था, परिक्षा केंद्र इत्यादि बाबतचा तपशिल पत्राने कळविण्यात येईल तसेच महापालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर पाहता येईल. लेखी परिक्षेमध्ये गुणानुक्रमे पात्र ठरणा-या उमेदवारांना मौखिक मुलाखतीची पत्रे लेखी परीक्षेचा निकाल जाहीर होताच समक्ष देण्यात येतील. तसेच लेखी परिक्षेचा निकाल महापालिकेच्या संकेतस्थळावर पाहता येईल. लेखी व मौखिक मुलाखतीमध्ये गुणानुक्रमे पात्र ठरणा-या उमेदवारांची निवडयादी व प्रतिक्षायादी महापालिकेच्या नोटीसबोर्डवर व वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येईल.

३०) अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस / मुलाखतीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्यावर अर्जदार विहित अर्हता धारण करणारा न आढळल्यास, गैरवर्तन करताना आढळल्यास, दबाव तंत्राचा वापर करताना आढळल्यास कोणतील चुकीची माहिती दिल्याचे निदर्शनास आल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

३१) सदर भरती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर स्थगित करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांनी राखून ठेवले आहेत.

**<u>उमेदवार निवडीची पध्दत :-</u>** <u>नगरसचिव व प्रशासन अधिकारी या पदाच्या लेखी परीक्षेसाठी</u> नमूद परिक्षा वेळेपुर्वी १ तास अगोदर परिक्षा केंद्रावर उपस्थित रहावे. लेखी परीक्षेतून मुलाखतीसाठी गुणानुक्रमे पात्र ठरणा-या उमेदवारांचा निकाल/यादी दिनांक २१/०९/२०१३ रोजी सायंकाळी ६.०० वाजलेनंतर महापालिकेच्या नोटीस बोर्ड व www.pcmcindia.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल. लेखी परिक्षेतून गुणानुक्रमे पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखती दि. २३/०९/२०१३ रोजी घेण्यात येतील. लेखी परिक्षा व मुलाखतीच्या एकूण प्राप्त गुणानुसार उमेदवारांची निवड यादी दिनांक २३/०९/२०१३ रोजी महापालिकेच्या नोटीस बोर्डवर व वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल. लेखी परिक्षेचा बैठक क्रमांक, बैठक व्यवस्था आणि परिक्षा केंद्र इ. बाबतचा सविस्तर तपशिल व इतर सूचना महापालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १०/०९/२०१३ रोजी पाहता येईल. तसेच याबाबतची यादी प्रशासन विभाग, पिंपरी चिंचवड महापालिकेचे मुख्य प्रशासकीय कार्यालय, ४ था मजला पिंपरी ४११ ०१८ या ठिकाणी कार्यालयीन वेळेत पाहणेस उपलब्ध राहील.

**सही/-**
(डॉ श्रीकर परदेशी)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८

सहाय्यक आयुक्त,प्रशासन
पिं.चिं.म.न.पा, पिंपरी ४११ ०१८

क्रमांक - प्रशा/१/कावि/१०१६/२०१३
दिनांक २९/०७/२०१३

प्रति,
मा. आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८

**उमेदवाराचे पासपोर्ट आकाराचे छायाचित्र**

**विषय :-** --------------------- पदासाठी अर्ज
**संदर्भ :- क्रमांक** दिनांक / /२०१३ च्या वर्तमानपत्रातील जाहिरात.

महोदय,

संदर्भिय जाहिरातीनुसार मी सरळसेवा प्रवेशाने ---------------------------- या पदासाठी आवश्यक ती अर्हता धारण करीत असून या पदासाठी निवड होण्याकरीता खालीलप्रमाणे विहीत नमुन्यातील अर्ज सादर करीत आहे.

१) संपूर्ण नाव :- ____________________

२) पत्रव्यवहाराचा पत्ता :- ____________________

२अ) मोबाईल नंबर ____________ ई-मेल ____________

२ब) आधार युआयडी क्र. /नोंदणी क्रमांक

३) जन्मतारीख :- [ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ]

४) लिंग - पुरुष [ ] स्त्री [ ]

४अ) विवाहित / अविवाहित

५) जात :- ____________________

६)उमेदवारांचा बँक खाते तपशिल :-

अ) बँकेचे नाव :-

ब) शाखेचे नाव :-

क) बचत खाते कमांक :-

खालीलपैकी लागू असलेल्या प्रवर्गाखालील चौकटीत ✓ अशी खुण करावी.

| अनु. जाती | अनु. जमाती | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

७) सेवायोजन कार्यालय/समाज कल्याण/एकात्मिक अदिवासी विकास प्रकल्प आदींकडे नोंदणी केलेली असल्यास नोंदणी क्रमांक व दिनांक - ----------------------------------------

८) खालील प्रवर्गात मोडत असल्यास योग्य त्या चौकटीत ✓ खुण करावी.

| महिला | माजी सैनिक | प्रकल्पग्रस्त | भुकंपग्रस्त | अपंग | खेळाडू |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

९) अर्जदाराने धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेचा तपशिल :-

| अ. क्र. | शैक्षणिक अर्हता | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले एकूण गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१०) अनुभव :- ____________________________________________

____________________________________________

वर नमुद केलेला तपशिल खरा व बरोबर असून त्याबाबत आवश्यक प्रमाणपत्राच्या प्रमाणीत प्रती सोबत जोडत आहे. मी असेही प्रमाणीत करतो / करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चूकीची आढळून आल्यास या माहितीच्या आधारे नोकरी वरुन कमी करण्यास व माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यास मी पात्र राहीन.

स्थळ :

दिनांक :

अर्जदाराची सही

सहपत्रे : १)

२)

३)

# विभागप्रमुखाचे प्रमाणपत्र

श्री /श्रीमती :- ------------------------------ पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील " नगरसचिव " या पदाकरीता दिनांक /०७/२०१३ रोजीच्या दै. --------------- या वर्तमानपत्रामधील जाहिरातीनुसार सरळसेवा प्रवेशाने अर्ज करू इच्छित आहेत. या पदासाठी आवश्यक असलेली व जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, पात्रता ते / त्या धारण करीत असून, ते/त्या --------------------- या शासकीय / निमशासकीय /स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये --------------------------- या गट - ब मधील पदावर दिनांक / / . रोजी रूजू झाले असून त्यांचा परिविक्षाधीन कालावधी वगळून ते दिनांक -------------------- पासून नियमित वेतनश्रेणीमध्ये कामकाज करीत आहेत. ते/त्या सध्या कार्यरत असलेल्या -------------------- या पदाची वेतनश्रेणी पे बँड र.रू -------------------- ग्रेड वेतन र. रू ------------------- अशी आहे.

श्री / श्रीमती -------------------------------------------- यांच्याबाबत उपरोक्त नमूद केलेली माहिती बरोबर असून, ती त्यांनी सादर केलेल्या शैक्षणिक, तांत्रिक प्रमाणपत्रांच्या व सेवानोंद पुस्तकावरील नोंदीवरून मी तपासली आहे. ते / त्या --------- ---------------- या पदावर नेमणूक देण्यासाठी आवश्यक ती अर्हता धारण करीत आहेत. याची मी खात्री केली असून, त्यांचा अर्ज दिनांक / /२०१३ पुर्वी आपले कार्यालयाकडे पाठवित आहे.

विभागप्रमुखाचा हुद्दा, सही व
कार्यालयाचा शिक्का

# विभागप्रमुखाचे प्रमाणपत्र

श्री /श्रीमती :- ---------------------------- पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील " प्रशासन अधिकारी " या पदाकरीता दिनांक /०७/२०१३ रोजीच्या दै. ------------------ या वर्तमानपत्रामधील जाहिरातीनुसार सरळसेवा प्रवेशाने अर्ज करू इच्छित आहेत. या पदासाठी आवश्यक असलेली व जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, पात्रता ते/त्या धारण करीत असून, ते/त्या -------------------------- या शासकीय / निमशासकीय /स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये ------------------------ या पदावर दिनांक / / रोजी रूजू झाले असून त्यांचा परिविक्षाधीन कालावधी वगळून ते दिनांक / / पासून नियमित वेतनश्रेणीमध्ये कामकाज करीत आहे. ते/त्या सध्या कार्यरत असलेल्या -------------------------- या पदाची वेतनश्रेणी पे बँड र.रू ------------------ ग्रेड वेतन रू. ----------------------- अशी आहे.

श्री / श्रीमती ---------------------------------------------- यांच्याबाबत उपरोक्त नमूद केलेली माहिती बरोबर असून, ती त्यांनी सादर केलेल्या शैक्षणिक, तांत्रिक प्रमाणपत्रांच्या व सेवानोंद पुस्तकावरील नोंदीवरून मी तपासली आहे. ते / त्या -------- ---------------- या पदावर नेमणूक देण्यासाठी आवश्यक ती अर्हता धारण करीत आहेत. याची मी खात्री केली असून, त्यांचा अर्ज दिनांक / /२०१३ पुर्वी आपले कार्यालयाकडे पाठवित आहे.

विभागप्रमुखाचा हुद्या, सही व
कार्यालयाचा शिक्का

# BANK OF BARODA

## CHALLAN

| BANK COPY | DEPARTMENT COPY | CANDIDATE COPY |
|---|---|---|
| To Commissioner,<br>Pimpri Chinchwad Municipal Corporation, Pimpri | To Commissioner,<br>Pimpri Chinchwad Municipal Corporation, Pimpri | To Commissioner,<br>Pimpri Chinchwad Municipal Corporation, Pimpri |
| Bank of Baroda | Bank of Baroda | Bank of Baroda |
| Candidate Name............ | Candidate Name............ | Candidate Name............ |
| Name of the Post................ | Name of the Post................ | Name of the Post................ |
| A/c No:..................... | A/c No:..................... | A/c No:..................... |
| Details: | Details: | Details: |
| [illegible] X.....<br>50 X.....<br>20 X....<br>10 X... | 100 X.....<br>50 X.....<br>20 X....<br>10 X... | 100 X.....<br>50 X.....<br>20 X....<br>10 X... |
| Total.................... | Total.................... | Total.................... |
| Transaction No............. | Transaction No............. | Transaction No............. |
| Signature....... | Signature....... | Signature....... |
| Bank Seal........ | Bank Seal........ | Bank Seal........ |
| **Note: While posting Name must be included in Particulars/Details field** | ****Note: While posting Name must be included in Particulars/Details field** | ****Note: While posting Name must be included in Particulars/Details field** |